ePaper

| वर्ष - 7 । अंक - 164 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । शनिवार, दिनांक 21 ऑक्टोबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शिक्षकांच्या कंत्राटी भरतीचा जीआर रद्द करणार, फडणवीसांची घोषणा




## आतील पानांत

- ऑस्ट्रेलियाचा सलग दुसरा विजय!
- नवरात्रीचा सातवा दिवस कालरात्रि देवीचा!
- पहिल्या जलद रेल्वे सेवेचे उद्घाटन!


## मराठ्यांना आरक्षण दिल्याशिवाय

# इंचभरही नाही हटणार मागे!

### मनोज जरांगे पाटील : राजगुरूनगर येथे विराट सभा

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजातील एका बांधवाने गुरुवारी आत्महत्या केली. मराठा समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला. मराठा समाज सुनील कावळे यांचं बलिदान वाया जाऊ देणार नाही. त्याच्या लेकराला मराठा समाज कधीच दूर करणार नाही. तसंच कुणबी जात प्रमाणपत्राशिवाय मागे हटणार नाही असा निर्धार आज मनोज जरांगे पाटील यांनी राजगुरुनगरच्या सभेत केला. एवढंच नाही तर आत्तापर्यंत मराठा बांधवांनी ज्या आत्महत्या केल्या त्याला सरकार जबाबदार असल्याचंही म्हटलं आहे.**



"आपला एक भाऊ सुनील कावळे याने आत्महत्या केली. त्याचं मला वाईट वाटतं आहे. मात्र सुनील कावळे यांचं बलिदान वाया जाणार नाही. मराठा समाजाच्या वेदना मला सहन होत नाहीत. मी हार तुरे स्वीकारण्यसाठी नाही तर मराठ्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी गावोगाव फिरतो आहे. मराठा बांधवांना आरक्षण मिळाल्याशिवाय एक इंचही मागे हटणार नाही. मराठा बांधवांनी आत्महत्या करु नये असं आवाहन मी पुन्हा एकदा करतो आहे. तसंच




आत्तापर्यंत ज्या आत्महत्या झाल्या त्यांना सरकार जबाबदार आहे." असा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला.

### मराठा समाज माझा मायबाप

मराठा समाज माझा मायबाप आहे. मायबापाच्या शब्दापुढे मी जाणार नाही. आपल्या वाट्याला कष्ट आले परंतु लेकरांच्या वाट्याला हे कष्ट नकोत. मराठा आरक्षण मिळवण्यासाठी राज्यातला मराठा एक झाला आहे. मराठा आरक्षण समाजाने समजून घेण गरजेचं आहे. मराठ्यांना आरक्षण द्यायचं म्हटलं की पुरावे लागतात. टिकणारे आरक्षण देण्यासाठी सरकारने वेळ एक महिन्यांचा वेळ मागितला. सरकारला आपण चाळीस दिवसांचा वेळ दिला. आपण मुदत दिल्यानंतर हालचालीनंतर वेग आला आहे. असंही त्यांनी स्पष्ट केलं.

### न्याय मिळवून देणार

मराठ्यांना शांततेचच न्याय मिळवून देणार "मराठा बांधवांचं आंदोलन शांततेत सुरु आहे. एकेकाळी मराठा समाज आरक्षणासाठी आक्रमक झाला होता. मात्र लक्षात ठेवा शांततेच आपल्याला आरक्षण मिळणार. मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत मी शांत बसणार नाही हा शब्द तुम्हाला आज या ठिकाणी मी देतो आहे."

# पालिकेच्या २० विभागाचा कारभार 'जीपीएस' द्वारे!

### आयुक्त शेखर सिंह यांची माहिती : स्मार्ट सिटी लिमिटेडमार्फत जीआयएस प्रकल्पाची अंमलबजावणी

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडमार्फत जीआयएस प्रकल्पांतर्गत पालिकेच्या 20 विभागांच्या दैनंदिन कामकाजासाठी जीआयएस कार्यप्रणाली सुरू करण्यात आली आहे. या कार्यप्रणालीनुसार यापुढे पालिकेच्या विविध विभागांचे कामकाज चालणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांनी दिली. मनपाच्या संबंधित विभागातील अधिकारी-कर्मचारी यांना एका क्लिकवर आपल्या कार्यक्षेत्रानुसार मनपाच्या सुविधांची (उदा. रस्ते, पाण्याची टाकी, पोल्स, फुटपाथ, उद्याने, प्रभागानुसार क्षेत्र, क्रीडांगणे, मनपा मालमत्ता आदी) ठिकाणे अशा 300 पेक्षा जास्त स्तर पाहता येणार आहे. त्यानुसार, आवश्यक माहिती संपादित करून अहवाल तयार करण्यात मदत होणार आहे, असे आयुक्त सिंह म्हणाले.

स्थायी समिती सभागृहात आयुक्त सिंह यांच्या हस्ते मनपाच्या 20 विभागांसाठी तयार केलेल्या पीसीएमसी जिओपोर्टल्सचे उद्घाटन करण्यात आले.

### यांची प्रामुख्याने उपस्थिती...

यावेळी, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, विजय खोराटे, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, रामदास तांबे, नगररचना उपसंचालक प्रसाद गायकवाड, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उपायुक्त विठ्ठल जोशी, उपायुक्त रविकिरण घोडके, मुख्य आरोग्य व वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे आदी उपस्थित होते.

# ललितला केमिकल इंजिनिअर लोहारेने दिला मेफेड्रॉनचा फॉर्म्युला!

## » संजय राऊतांचा महाराष्ट्र सरकारवर हल्लाबोल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केमिकल इंजिनिअर अरविंदकुमार प्रकाशचंद्र लोहारे याने ललित पाटील याला येरवडा कारागृहात मेफेड्रॉन (एमडी) तयार करण्याचा फॉर्म्युला दिला. तो फॉर्म्युला ललितने भूषणला दिल्यानंतर त्यांनी नाशिकमध्ये मेफेड्रॉनचा कारखाना सुरू केला.**

त्यातून अमली पदार्थ तस्करीचे साम्राज्य निर्माण केल्याची माहिती पोलिसांनी शुक्रवारी न्यायालयात दिली. चाकण येथील अमली पदार्थ विक्रीच्या गुन्ह्यात ललितला अटक केली होती. त्यानंतर ललित आणि लोहारे यांची येरवडा कारागृहात भेट झाली. त्यावेळी लोहारे याने ललितला मेफेड्रॉन तयार करण्याचा फॉर्म्युला दिला. लोहारे सध्या येरवडा कारागृहात आहे. त्यालाही आता या गुन्ह्यात वर्ग करून चौकशी करण्यात येणार आहे. ललित सध्या मुंबई पोलिसांच्या कोठडीत आहे. दरम्यान, ललितचा भाऊ भूषण पाटील आणि अभिषेक बलकवडे यांची पोलिस कोठडीची मुदत आज संपत आली होती. त्यांना शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपींनी केलेला गुन्हा गंभीर असून, गुन्ह्याचा सखोल तपास करण्यासाठी भूषण आणि बलकवडेच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी सहायक सरकारी वकील निलीमा यादव-





इथापे यांनी केली. न्यायालयाने ती मान्य करत दोघांच्या पोलिस कोठडीत २२ ऑक्टोबरपर्यंत वाढ केली. तपासादरम्यान अमली पदार्थ तस्करीच्या गुन्ह्यात ललितचे आणखी दोन साथीदार निष्पन्न झाले आहेत. झिशान शेख आणि रोहन ऊर्फ गोलू अन्सारी अशी त्यांची नावे आहेत. ते अनुक्रमे येरवडा आणि तळोजा कारागृहात आहेत. याबाबत त्यांच्याकडेही तपास करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. नाशिकमध्ये एमडी ड्रग्स कारखान्याचा सेटअप उभारण्यासाठी अन्सारीने ललित पाटील याला मदत केली होती. तसेच अन्सारी हा ड्रग्सची मोठ्या प्रमाणात विक्री करत होता. नाशिकमधील कारखाना बांधायला गोलूने मदत केल्याची माहिती आहे. या प्रकरणामध्ये रेहान शेख अन्सारी उर्फ गोलू याला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

### ललितच्या कारचालकाला अटक

» ललित पाटील ससून ड्रग्ज प्रकरणी पोलिसांचा कारवाईचा तडाखा सुरूच आहे. ललित पाटीलला पळून जाण्यास मदत केलेल्या दोन मैत्रिणींना कालच पुणे पोलिसांनी थेट नाशिकमध्ये जाऊन अटक केली होती. त्यानंतर आता आणखी एका व्यक्तीला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. सचिन वाघ असं अटक करण्यात आलेल्याच नाव आहे. अटक केलेला हा ललित पाटील याचा कारचालक आहे. बंगळुरूत ललित पाटील याचा मित्र सचिन वाघ हे दोघे सोबत असल्याचा पोलिसांना संशय आहे. आता मुंबई पोलिसांनी ललित पाटील याचा मित्र असलेला त्याच्या कारचालकाला काल रात्री उशीरा बेड्या ठोकल्या आहेत.

ड्रग्जचा कारखाना उभारण्यासाठी रेहान शेखने ललित पाटीलला मदत केल्याची माहिती मिळत आहे. ड्रग्सची विक्री, त्यातून येणारे पैसे आणि कारखाना या गोष्टींची होती जबाबदारी रेहान शेखकडे होती. पुणे पोलिसांनी मुंबई पोलिसांकडून रेहान अन्सारीचा ताबा घेतला आहे. ललित पाटील प्रकरणात रेहान अन्सारीदेखील आरोपी आहे. त्याला मुंबई पोलिसांनी ठाण्यातून २० ऑगस्ट रोजी अटक केली होती. दरम्यान, ललित पाटील ड्रग्ज प्रकरणी ठाकरे गटाच्या वतीने नाशिकमध्ये मोर्चा काढण्यात आला होता. खासदार संजय राऊत यांच्या नेतृत्वात हा मोर्चा संपन्न झाला. राऊत यांनी महाराष्ट्र सरकारवर हल्लाबोल करत जोरदार टीकास्त्र सोडलं.

# महात्मा फुले-सावित्रीबाई फुलेंच्या कार्याचा जागर!

## » स्मारकाचे काम तातडीने सुरू करा: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भिडे वाड्याचे स्मारकात रूपांतर करण्याच्या दृष्टीने कार्यवाहीवर भर दिला आहे. न्यायालयाने भूसंपादनासाठी पूर्वीचेच निवाडे (अवॉर्ड) कायम ठेवले असले, तरी मोबदला २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार द्यावा लागणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया सुरू केली आहे. दरम्यान, महापालिकेने पूर्वीच तयार केलेल्या प्राथमिक संकल्पचित्रानुसार पूर्वतयारी सुरू केली आहे.**

महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिवाजी रस्त्यावरील भिडे वाडा येथे मुलींची पहिली शाळा सुरू केली होती. त्याचे स्मारक करण्याचा निर्णय पालिकेने घेतला. मात्र, त्याला जागामालक व पोटभाडेकरूनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. मात्र, उच्च न्यायालयाने ही याचिका निकाली काढत महापालिकेच्या बाजूने निकाल दिला.

महापालिकेने यापूर्वी केलेल्या निवाड्यानुसारच जागेचा मोबदला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. मात्र, हे आदेश देताना २०१३ मध्ये नव्याने आलेल्या भूसंपादन कायद्यानुसार फरकाची रक्कमही द्यावी, असेही आदेशात नमूद केले आहे. यासाठी



महापालिकेची आधीपासूनच तयारी आहे. याशिवाय कोणी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यास महापालिकेने कॅव्हेटही दाखल केले आहे. दरम्यान, निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्मारकाचे काम तातडीने सुरू करण्याचे आदेश महापालिका व जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार जागेचे नव्याने मूल्यांकन केले जात आहे. यानंतर भूसंपादनासाठी जाहीर नोटीस प्रसिद्ध केली जाईल. नोटीसीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर कायदेशीर प्रक्रियेद्वारे प्रत्यक्ष

### स्मारक करण्याचा निर्णय पालिकेचा

» महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिवाजी रस्त्यावरील भिडे वाडा येथे मुलींची पहिली शाळा सुरू केली होती. त्याचे स्मारक करण्याचा निर्णय पालिकेने घेतला. मात्र, त्याला जागामालक व पोटभाडेकरूनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. मात्र, उच्च न्यायालयाने ही याचिका निकाली काढत महापालिकेच्या बाजूने निकाल दिला. महापालिकेने यापूर्वी केलेल्या निवाड्यानुसारच जागेचा मोबदला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. मात्र, हे आदेश देताना २०१३ मध्ये नव्याने आलेल्या भूसंपादन कायद्यानुसार फरकाची रक्कमही द्यावी, असेही आदेशात नमूद केले आहे. यासाठी महापालिकेची आधीपासूनच तयारी आहे. याशिवाय कोणी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यास महापालिकेने कॅव्हेटही दाखल केले आहे.

भूसंपादन केले जाईल, अशी माहिती महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. भिडे वाडा येथील स्मारकाचा प्राथमिक संकल्पचित्र महापालिका प्रशासनाने यापूर्वीच तयार करून ठेवले आहे. सुमारे २ हजार चौरस फुटांचा हा कौलारू वाडा पूर्वीप्रमाणेच दुमजली स्वरूपात उभारला जाईल.

# विस्कटलेली घडी पुन्हा बसवू!

## उपमुख्यमंत्री अजित पवार : गणेशोत्सव स्पर्धेचे पारितोषिक वितरण

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसची महापालिकेत सत्ता असताना या शहराचा नियोजनबद्ध पध्दतीने विकास करण्यात आला. सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून या शहराची ओळख, लौकिक होता. सध्या त्या इमेजला गालबोट लागले आहे. त्यामुळे पुन्हा विस्कटलेली घडी बसवायची आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी (दि.20) केले.**




आकुर्डी, प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित केलेल्या गणेशोत्सव आणि गौरी गणपती सजावट स्पर्धेतील विजेत्यांचा उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री पवार बोलत होते.

या वेळी आमदार अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर संजोग वाघेरे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक राहूल भोसले, महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, युवक शहराध्यक्ष शेखर काटे, प्रदेश सरचिटणीस विशाल काळभोर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, शहरात प्रशस्त रस्ते, उड्डाणपूल, उद्याने, शाळा, स्वच्छ पाणी नागरिकांना देण्यासाठी मी प्रयत्न केला आहे. पिंपरी-चिंचवडवर माझे विशेष प्रेम असल्यामुळे शहराचा चेहरा मोहरा बदलला. सध्या अधून मधून काही लोक येऊन दिखावा करत असल्याचा टोला त्यांनी लगावला. सर्वांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणे आवश्यक आहे. मात्र डीजेचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. त्याचा नागरिकांना त्रास होत आहे. इथून पुढे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करू, असा इशारा उपमुख्यमंत्री पवारांनी दिला.

### कार्यकर्त्यांची गर्दी ओसरली?

अजित पवार यांनी वेळेत उपस्थिती लावत कार्यक्रमाला हजर झाले पण निगडीत ग.दि.मा नाट्यगृह निम्मे रिकामे होते. राष्ट्रवादीत फूट पडण्यापूर्वी अजित पवार यांच्या पिंपरी-चिंचवड दौऱ्यात कार्यकर्त्यांची तुंबळ गर्दी पहायला मिळत होती. अजित पवार यांनी महायुतीत सहभागी होत उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले. त्यानंतर गेल्या काही दिवसांत राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि आमदार रोहीत पवार यांनी शहरात लक्ष घातले आहे. माजी महापौर आझम पानसरे यांच्यासह अनेक ज्येष्ठ आजी-माजी नगरसेवकांनी शरद पवार गटाला समर्थन केले आहे. परिणामी, अजित पवार समर्थक कार्यकर्त्यांची गर्दी कमी झाली आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

---

# सोसायटीधारकांच्या वैद्यकीय सुविधेसाठी स्वतंत्र यंत्रणा!

## महापालिका सकारात्मक : सोसायटी प्रतिनिधी-वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत चर्चा स्थानकाचा होणार विकास

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व सोसायट्यांमध्ये वैद्यकीय सोयी-सुविधा पुरविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभाराव्यात, असा सूर सोसायटी प्रतिनिधींना काढला आहे. त्याचा सोसायटी मधील ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी यांच्यासह सर्वांनाच फायदा होईल. या बाबत सकारात्मक विचार करण्याच्या सूचना पिंपरी-चिंचवड शहरातील सोसायटीच्या प्रतिनिधींनी वैद्यकीय विभागाला दिल्या.**



पिंपरी चिंचवड शहरातील सोसायट्यांचे प्रतिनिधी, शहरातील सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाचे प्रमुख यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील गृहनिर्माण संस्थांतील सभासदांपर्यंत वैद्यकीय सुविधा पोहोचाव्यात यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी वैद्यकीय विभागाकडून हे आश्वासन देण्यात आले होते.

या बैठकीला महापालिकेच्या वैद्यकीय विभागाचे अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी चिंचवड सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, रावेत पुनावळे फेडरेशनच्या अध्यक्षा प्राजक्ता रुद्रावार, पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे प्रवक्ता अरुण देशमुख, पिंपरी चिंचवड फेडरेशनचे सचिन लोंढे या वेळी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये शहरातील सर्व गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांपर्यंत आरोग्य आणि वैद्यकीय सुविधा पुरविण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, यावर सोसायटीच्या प्रतिनिधींनी आपले म्हणणे मांडले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या सोयी सुविधा पिंपरी चिंचवड शहरातील सर्व झोपडपट्टीधारकांपर्यंत पोचविल्या जातात. आशा वर्कर, वैद्यकीय विभागाचे एएनएम, एमपीडब्ल्यू, वैद्यकीय अधिकारी आदी यंत्रणा त्यासाठी काम करत आहे. त्यामुळे झोपडपट्टीतील नागरिकांचे साथीचे आजार, संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण होत आहे.

मात्र पिंपरी चिंचवड शहरातील शहरी भागांमध्ये असणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थेत महापालिकेच्या सुविधा पुरविल्या जात नसल्याचे गाऱ्हाणे सोसायटीच्या प्रतिनिधींनी मांडले. उच्चभ्रू सोसायटीमधील लहान मुले, गरोदर महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्या पर्यंत वैद्यकीय मदत लवकरच पोचण्याची व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. त्यासाठी महापालिका स्तरावर एक स्वतंत्र यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. त्या यंत्रणेद्वारे सोसायटीधारकांना वैद्यकीय योजनांचा लाभ देता येईल, असे मत सोसायटीच्या प्रतिनिधींनी मांडले. या बाबत वैद्यकीय विभागाकडून सकारात्मक पाऊले उचलण्याचे आश्वासन देण्यात आल्याची माहिती चिखली-मोशी- चऱ्होली -पिंपरी चिंचवड हाउसिंग सोसायटी वतीने देण्यात आली.


> **कोविडचा प्रादुर्भाव वाढत असताना पिंपरी चिंचवड महापालिकेने योग्य उपाययोजना करत शहरातील नागरिकांची काळजी घेतली होती. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे काम वाखाणण्याजोगे आहे. सध्याही वैद्यकीय सक्षम यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक ती सर्व मदत फेडरेशनच्या माध्यमातून देखील केली जाईल. सोसायटीमध्ये सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक मदतीसाठी आम्ही एक पाऊल पुढे येऊ. शहरातील महापालिका रुग्णालयात कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांच्या सूचनेनुसार बेड आरक्षित ठेऊ नये. तर ज्यांना आवश्यकता आहे. अशा गरजू व्यक्तींना त्वरीत उपचार मिळावेत, यासाठी बेड आरक्षित करणे गरजेचे आहे.**
>
> - संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी- चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाउसिंग सोसायटी.




# बुकरायण: अस्वस्थ काळाची भेदक नोंद!

**जोनथन एस्कोफरीच्या 'इफ आय सव्हाईव्ह यू'मधल्या पहिल्या कथेतलं पहिलंच वाक्य आहे, 'इट बिगिन्स विथ व्हॉट आर यू?' हे वाक्य या पूर्ण पुस्तकाचं केंद्र आहे असं म्हणता येईल. एक व्यक्ती म्हणून आपण कोण आहोत, आपली ओळख काय, हे कशावरून ठरतं, हा प्रश्न एस्कोफरी आपल्याला त्याच्या लेखनामधून वारंवार विचारतो, विचारतच राहतो.**

तुम्ही कुठून आलात, कसे दिसता, तुमचा रंग काय, वर्ण काय, तुमची सांस्कृतिक पार्श्वभूमी कोणती, तुम्ही कोणत्या समूहाचा भाग आहात, तुमची भाषा कोणती, असे अनंत प्रश्न इथे उभे राहतात. एस्कोफरीची पात्रं या प्रश्नांची उत्तरं देण्यासाठी झगडत राहतात. कधी थकतात, कधी तडजोडी करतात, कधी हरतात, पण नव्या दमाने पुन्हा उभी राहतात. आपण जसं हे पुस्तक वाचत जातो, तसे त्यांना पडणारे हे प्रश्न आपल्यालाही भेडसावयला लागतात, आपलेच होतात आणि आपणही या आत्मशोधाचा भाग होऊन जातो. 'इफ आय सव्हाईव्ह यू'मध्ये परस्परांशी जोडलेल्या आठ कथा आहेत. त्या मायामी शहरात स्थायिक झालेल्या जमेकन कुटुंबाभोवती फिरतात. कुटुंबातला धाकटा मुलगा ट्रिलॉनी हे यातलं प्रमुख पात्र आहे, जे लेखकाचा दृष्टिकोन आपल्यापर्यंत थेटपणे पोचवतं. ट्रिलॉनी सुशिक्षित आहे, त्याचा जन्म कुटुंब अमेरिकेत




आल्यानंतरचा असल्याने तो स्वत:ला अमेरिकन मानतो. त्याचं बोलणं, चालणं अमेरिकन वळणाचं आहे. पण त्यामुळेच तो उपरा ठरतो. कुटुंबात आणि कुटुंबाबाहेरदेखील. टॉपर आणि सान्या या त्याच्या आईवडिलांना डेलानो हा त्याचा मोठा भाऊ अधिक जवळचा वाटतो. वडिलांना भावाबद्दल वाटणारी जवळीक हे या संपूर्ण कथाचक्रातलं एक महत्त्वाचं सूत्र आहे, जे पुढे घडणाऱ्या अनेक घटनांना कारणीभूत ठरतं.

ट्रिलॉनीला तो अमेरिकन आहे, असं वाटत असलं, तरी ते पुरेसं नाही, हे समाज त्याला दाखवून देतो. वडिलांबरोबरच्या एका वादामुळे ट्रिलॉनीला घर सोडणं भाग पडतं, तेव्हा तर हा प्रश्न अधिकच उग्र, विदारक रूप धारण करतो, पुस्तकातल्या आठ कथांमधल्या पहिल्या दोन, म्हणजे ट्रिलॉनीचा दृष्टिकोन मांडणारी 'इनफ्लक्स' आणि जमेकन इमिग्रन्ट असलेल्या त्याच्या वडिलांचा दृष्टिकोन मांडणारी 'अंडर द ॲकी ट्री' या पुस्तकाची पार्श्वभूमी पक्की उभी करण्याचं काम करतात. वर्णीय तशीच सांस्कृतिक ओळख, आणि तिच्या शोधात ट्रिलॉनीपुढे तयार होणारे अनेक प्रश्न 'इनफ्लक्स'मध्ये येतात, तर टॉपरचं तरुणपण, लग्न, देश सोडण्याची गरज तयार होणं, अमेरिकेतले दिवस, आणि संघर्ष, हा सारा भाग 'अंडर द ॲकी ट्री'मध्ये येतो. एकूण पुस्तकाचं फ्रेमवर्क असं उभं राहिलं, की इतर कथा या विशिष्ट व्यक्तिरेखा, प्रसंग, काळ, समस्या अशा गोष्टींवर लक्ष केंद्रित करतात. या कथा स्वतंत्रपणे उत्तम म्हणाव्यात अशाच आहेत, पण एकत्रितपणे, इतर कथांच्या संदर्भासह त्या कितीतरी अधिक प्रभावी ठरतात. त्यामुळेच या पुस्तकाला कथासंग्रह वा कथामालिका म्हणण्यापेक्षा (जरी तेही चुकीचं ठरणार नाही) कादंबरी म्हणणंच मला अधिक बरोबर वाटतं. कथामालिकांमध्ये तीच पात्रं आपल्याला पुन्हापुन्हा भेटू शकतात हे खरं आहे. पण काळानुसार कथानकाचं एका विशिष्ट दिशेने पुढे सरकणं, किंवा एपिसोडिक न राहता संपूर्ण कथानकाचा सलग प्रभाव पडणं, हे कथामालिकांमध्ये क्वचित पाहायला मिळतं. इथे पाहायला मिळणाऱ्या आठ कथांमध्ये असा एकसंध परिणाम घडवण्याची क्षमता निश्चितच आहे. एस्कोफरीने निवडलेली निवेदनशैली विशेष आहे, कारण ती सर्व कथांना सारख्या रीतीने वापरण्यात येत नाही. काही कथा सहभागी पात्रांचा दृष्टिकोन प्रथमपुरुषी निवेदनातून मांडतात, कधी तो तृतीय पुरुषी होतो, पण सर्वात इन्टरेस्टिंग निवेदन वर उल्लेख केलेल्या पहिल्या दोन कथा, आणि शेवटची 'इफ आय सव्हाईव्ह यू' यांमध्ये आढळतं. हे द्वितीय पुरुषी निवेदन आहे. म्हणजे निवेदक इथे 'मी असं असं केलं' असं न म्हणता 'तुम्ही असं असं कराल' असं सांगतो. या प्रकारचं निवेदन हे एकूणच कथासाहित्यात क्वचित आढळतं, आणि ते वापरलं जातं, तेव्हा त्यामागे काही एक तर्कसंगत भूमिका असावी लागते, अन्यथा ते वाचणाऱ्याला गोंधळात पाडण्याची शक्यताच अधिक असते. इथे त्याचा वापर अर्थपूर्ण आहे. शेवटच्या कथेत तर तो फारच तीव्रतेने जाणवणारा आहे, पण पहिल्या दोन कथांमध्येही या वापरातून एक इंटरॅक्टिविटी येते.

## संपादकीय »

# मर्यादापालन


***'विशेष विवाह कायदा' बदलणे, नवा कायदा करणे आमच्या हाती नाही, असे सर्वोच्च न्यायालय म्हणते.***

जे काही सुरू ते अयोग्य आहे असे मत व्यक्त करायचे, या संदर्भात योग्य काही करण्याची गरज नमूद करायची, तशी योग्य पावले न उचलली गेल्यास काय होईल याचा इशारा द्यावयाचा पण निर्णय घेण्याची वेळ आल्यावर मात्र आम्हास तो अधिकार नाही असे म्हणायचे हे सर्वोच्च न्यायालयाबाबत अलीकडे वारंवार दिसून आले. समलिंगीयांस विवाहाचा अधिकार देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिलेला निकाल याच मालिकेतील. व्यवस्थेवर ताशेरे ओढायचे पण व्यवस्थेत निर्णायक बदल होईल असा निर्णय देणे मात्र टाळायचे या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रवृत्तीवर 'लोकसत्ता'ने अलीकडेच (२७ सप्टेंबर) 'ताशेऱ्यांची (तकलादू) तडतड' या संपादकीयातून भाष्य केले होते. हाही निर्णय तसाच दिसतो. तो देताना सर्वोच्च न्यायालयाने केलेले भाष्य मात्र दखल घ्यावे असे. विवाहसंस्था काळानुरूप बदलत आलेली आहे; ती चिरस्थायी नाही.

**इंटेलिजन्स फेल्युअरचा अर्थ हेरखात्याकडे माहिती नसते वा चुकीची असते असा नसून राजधानीतल्या धोरण ठरवणाऱ्या राजकीय धुरीणांना आपले म्हणणे पटवून देण्यात त्यांना आलेले अपयश असा आहे. वर्तमानात गाझामधून इस्रायलवर झालेल्या हल्ल्याबद्दल असेच घडले असण्याची शक्यता मोठी आहे. ज्या योम किप्पुर लढाईच्या ५० व्या वर्षी हा कल्लोळ सुरू झालेला आहे त्या युद्धातही असेच घडले होते.**

# इस्रायलसाठी 'देवदूत' ठरलेला गुप्तहेर ..!

२००९ साली उघड केलेल्या सीआयएच्या कागदपत्रात म्हटले आहे की युद्ध होईल हे सांगणारी पुष्कळ माहिती हेरखात्याकडे होती, पण त्यावरून काढलेल्या चुकीच्या निष्कर्षांमुळेच १९६७ युद्धात जिंकलेल्या प्रदेशावर पाणी सोडायची वेळ इस्रायलवर आली आणि या देशाचे २५०० सैनिक मरण पावले. असे इतिहासात अनेकदा झाले आहे. कायम तारेवरची कसरत करत जगणाऱ्या इस्रायलसारख्या देशांचे या बाबतीतले यश आणि अपयश दोन्ही टोकाचे असते. अशा परिस्थितीत समजा शत्रुराष्ट्राच्या अध्यक्षांचा जावईच हेर असेल तर त्या घडामोडी वाचणे नक्कीच आकर्षक असते. 'द एजंल' हे उरी बार जोसेफ यांचे पुस्तक असेच आहे. २७ जून २००७ रोजी दुपारी अश्रफ मरवान हा अतिश्रीमंत इजिप्शियन उद्योगपती लंडनमधल्या कॅल्र्टन हाऊस या राहत्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून पडून मरण पावला. काही लोकांनी त्याला उडी मारताना पाहिले होते. त्याने उडी




मारली की त्याला तसे करण्यास भाग पाडले गेले, त्या वेळी त्याच्या घरात आणखी कोणी होते की नाही, याविषयी संदिग्धता आहे. मध्यमवर्गीय असलेल्या अश्रफ मरवानने गमाल अब्देल नासेर या इजिप्तच्या सर्वाधिक लोकप्रिय राष्ट्राध्यक्षाच्या मुलीशी लग्न केले होते.

नासेरला हे लग्न मान्य नव्हते, पण सलाउद्दीननंतरचा सर्वशक्तिमान समजला जाणारा हा राष्ट्राध्यक्ष मुलीपुढे झुकला. नासेरने अश्रफ मरवानला आपला जावई म्हणून स्वीकारले, पण त्याला विशेष वागणूक दिली नाही. नासेरपुढे काही बोलायची अश्रफची हिंमतही नव्हती. नासेरने त्याला, शमी शरीफ या आपल्या अंतर्गत सुरक्षा मंडळाच्या अध्यक्षाच्या ऑफिसमध्ये काम दिले. त्याच्यावर लक्ष राहील, हा हेतू होताच. तिथे अश्रफ सहाव्या दर्जाचा अधिकारी होता. तेथे त्याला फारसा पगार नव्हता. सर्वशक्तिमान सासरेबुवा व आपल्यावर लक्ष ठेवणारा त्यांचा खमक्या अधिकारी यांच्या हाताखाली अश्रफ गुदमरू लागला.

त्यामुळे पदव्युत्तर शिक्षणासाठी पत्नीसह लंडनला जायचा आग्रह त्याने नासेरकडे धरला. वडील परत मुलीपुढे झुकले. अश्रफ लंडनमध्ये वाहवत गेला. तिथे त्याने केलेले कर्ज कतारच्या राजघराण्याने फेडले. ही बातमी समजताच नासेरने त्याला परत बोलावून ते पैसे ताबडतोब परत करायला लावले व मुलीस घटस्फोटाचा सल्ला दिला. तो तिने धुडकावून लावला. शेवटी नासेरने अश्रफला केवळ परीक्षा देण्यासाठी अध्येमध्ये लंडनला जाण्याची परवानगी दिली. पण त्याच्या दुर्गुणाबरोबरच त्याचे काही गुणदेखील नासेरच्या नजरेस आले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मराठा बांधवांच्या आतापर्यंतच्या आत्महत्यांना सरकार जबाबदार!

## » मनोज जरांगे- पाटील यांचा सरकारवर आरोप

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आपल्या बांधवाने मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आत्महत्या केली. सुनील कावळे यांचे बलिदान वाया जाणार नाही. आतापर्यंतच्या मराठा बांधवांनी केलेल्या आत्महत्यांना सरकार जबाबदार असल्याचा आरोप करून मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही, असा एल्गार पुकारला.**



मराठा आरक्षण आंदोलनातील नेते मनोज जरांगे पाटील महाराष्ट्रभर दौरा करत आहेत. पुणे दौऱ्यामध्ये शुक्रवारी जरांगे यांची राजगुरूनगर आणि जुन्नर येथे सभा झाली. शिवनेरी किल्ल्यावर झालेल्या सभेत जरांगे पाटील म्हणाले, सुनील कावळे यांच्या आत्महत्येला सरकार जबाबदार आहे सरकारने मराठा आरक्षणाचा विषय गांभीर्याने घ्यावा असे त्यांनी बजावले.

मनोज जरांगे पाटील मंचावर असतानाच अचानक एक तरुण मंचावर आला. या आक्रमक तरुणाला जरांगे यांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न करूनही तो ऐकायला तयार नव्हता. या वेळी मंचावरील इतरांनी त्याला पकडून खाली नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने विरोध केला. त्यामुळे मंचावर काही वेळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर आयोजकांनी या तरुणाला उचलून मंचावरून खाली नेले. कुणबीचा सुधारित शब्द शेती आहे. त्यामुळे यांना कुणबी का चालत नाही. प्रमाणपत्राला विरोध करणारेच ते घ्यायला सर्वात पुढे असतील. आता कुणबी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय मागे हटणार नाही. भविष्य आणि अस्तित्वासाठी आरक्षण महत्त्वाचं आहे. लढाई आता अंतिम टप्प्यात आली आहे, असं जरांगे पाटील म्हणाले. मराठा आरक्षणाबाबत महत्त्वाची माहिती समोर येत आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी स्थापन केलेल्या संदिप शिंदे समितीने आणखी दोन महिन्यांची मुदत मागितली आहे. काही पुरावे गोळा करण्यासाठी हा वेळ मागण्यात आल्याचं समजतं.

### भुजबळ, मुंडे यांच्यासह पवारांवर निशाणा

» या राज्यात मागील ७५ वर्षात जेवढे पक्ष झाले त्या पक्षांच्या नेत्यांना मोठं करण्याचं काम बाप जाद्या मराठ्यांनी केलं आहे. त्यांना मोठे करण्याचे कारण एकच की, त्यांनी कधी जात बघितली नाही .. मग ते येवल्याचे असू.. बीडचे असो बारामतीचा असो... यांच्यात कधीही जात बघितली नाही त्यांची पक्षात मान आणि प्रतिष्ठा वाढविली असं म्हणत त्यांनी मंत्री छगन भुजबळ, धनंजय मुंडे यांच्यासह पवार यांच्यावर नाव न घेता निशाणा साधला.. मराठा आरक्षणा संदर्भातील हे शांततेच्या युद्धामुळे निर्णय प्रक्रियेत आले आहे.

---

# राऊतांच्या मार्गदर्शनाखाली ललित पाटील शिवसेनेत

## » ड्रग्ज प्रकरणावरून दादा भुसेंचा उद्धव ठाकरेंवर गंभीर आरोप

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नाशिकमधलं ड्रग्ज प्रकरण आणि ड्रग्जची तस्करी करणारा ललित पाटील गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. या ललित पाटीलवरून महाराष्ट्राचं राजकारण तापलं आहे. ड्रग्ज प्रकरणावरून शिवसेनेचा ठाकरे गट आणि शिंदे गट एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत.**

दरम्यान, ललित पाटील खटला, ड्रग्ज प्रकरण, अंमली पदार्थांची तस्करी, राज्यातील ढासळलेली कायदा आणि सुव्यवस्था या महत्त्वांच्या विषयांकडे लोकांचं लक्ष वेधण्यासाठी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या नेतृत्वात शिवसेनेने नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेला. यावेळी संजय राऊत यांनी ललित पाटील प्रकरणावरून नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांच्यावर आरोप केले आहेत. या आरोपांना दादा भुसे यांनी उत्तर देताना ललित पाटीलला उद्धव ठाकरे यांनीच शिवसेनेत घेतलं होतं असा गंभीर आरोप केला आहे.

दादा भुसे म्हणाले, प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे, मोर्चा काढण्याचाही अधिकार आहे. त्यावर आमची काही हरकत नाही. पण मोर्चा काढत असताना काही शैक्षणिक संस्थांनी शाळा बंद केल्या. ज्या शिक्षक बांधवांचं ज्ञानदानाचं काम आहे, त्यांना त्यापासून वंचित ठेवून सक्तीने मोर्चात सहभागी व्हायला लावलं. शाळा बंद करून विद्यार्थ्यांना मोर्चात बोलवावं लागलं. मोर्चा यशस्वी करण्यासाठीचा हा केविलवाणा प्रयत्न आहे. आम्ही ड्रग्जचं समर्थन करत नाही. ड्रग्ज नाशिकमध्ये, महाराष्ट्रात किंवा संपूर्ण देशात कुठेही असुदे, त्याचं समर्थन नाहीच. यासंदर्भात कोणतीही चौकशी करावी, यामध्ये जो कोणी दोषी असेल, पालकमंत्री दोषी असेल तर त्यावरही कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आम्ही यापूर्वीच केली आहे. दादा भुसे म्हणाले, संजय राऊत हे शिवसेनेचे उत्तर महाराष्ट्राचे नेते असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली उद्धव ठाकरे यांनी ललित पाटीलच्या हातावर शिवबंधन बांधून त्याला शिवसेनेत प्रवेश दिला होता. त्यामुळे त्याच्याकडू कोणाला हप्ते मिळत होते हे पोलीस तपासात समोर येईल. नाशिकचे पालकमंत्री म्हणाले, मालेगावात गेल्या १०-१२ वर्षापूर्वी कुत्ता गोळी प्रकार आला. या व्यसनापासून लोकांना दूर केलं पाहिजे म्हणून आम्ही सातत्याने पाठपुरावा केला.



### प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार

» प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे, मोर्चा काढण्याचाही अधिकार आहे. त्यावर आमची काही हरकत नाही. पण मोर्चा काढत असताना काही शैक्षणिक संस्थांनी शाळा बंद केल्या. ज्या शिक्षक बांधवांचं ज्ञानदानाचं काम आहे, त्यांना त्यापासून वंचित ठेवून सक्तीने मोर्चात सहभागी व्हायला लावलं. शाळा बंद करून विद्यार्थ्यांना मोर्चात बोलवावं लागलं. मोर्चा यशस्वी करण्यासाठीचा हा केविलवाणा प्रयत्न आहे. आम्ही ड्रग्जचं समर्थन करत नाही. ड्रग्ज नाशिकमध्ये, महाराष्ट्रात किंवा संपूर्ण देशात कुठेही असुदे, त्याचं समर्थन नाहीच.

# देशातील पहिल्या जलद रेल्वे सेवेचे उद्घाटन!

## » पंतप्रधान मोदींच्या हस्ते करण्यात आले उद्घाटन

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**देशातील पहिल्या प्रादेशिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टम (आरआरटीएस) म्हणजेच प्रादेशिक जलद संक्रमण प्रणालीच्या जलद रेल्वे सेवेचे उद्घाटन उत्तर प्रदेशच्या गाझियाबाद जिल्ह्यातील साहिबााबाद येथे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते करण्यात आले. पंतप्रधान मोदींनी आरआरटीएस कनेक्ट ॲपचे देखील उद्घाटन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या मोबाईलवरून पहिले तिकीट खरेदी केले.**



### देशाची आर्थिक ताकद वाढली

» पंतप्रधान मोदी म्हणाले की 'आज सुरू झालेली हायस्पीड नमो भारत ही मेड इन इंडिया आहे. भारताची स्वतःची ट्रेन आहे. नमो इंडिया ट्रेन ही भविष्यातील भारताचे चित्र आहे. देशाची आर्थिक ताकद वाढली की आपल्या देशाचे चित्र कसे बदलते याचाही नमो इंडिया ट्रेन हा पुरावा आहे. तसेच 'ज्या गोष्टींचे आम्ही भूमिपूजन करतो, त्या गोष्टींचे उद्घाटन देखील आम्हीच करतो,' असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना चिमटा काढला. दरम्यान, उद्घाटनानंतर पंतप्रधान मोदींनी नमो भारत ट्रेनमधुन प्रवास केला. यावेळी त्यांनी ट्रेनमधील महिला कर्मचारी आणि शाळकरी मुलांशी संवाद साधला.

या जलद रेल्वे सेवेचे नाव आधी रॅपिडेक्स ठेवण्यात आले होते. मात्र उद्घाटनापूर्वी केंद्र सरकारने या रॅपिडेक्स ट्रेनचे नाव बदलून 'नमो भारत' असे केले आहे. यावर काँग्रेसने जोरदार हल्ला चढवला आहे.

याप्रसंगी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की 'आज सुरू झालेली हायस्पीड नमो भारत ही मेड इन इंडिया आहे. भारताची स्वतःची ट्रेन आहे. नमो इंडिया ट्रेन ही भविष्यातील भारताचे चित्र आहे. देशाची आर्थिक ताकद वाढली की आपल्या देशाचे चित्र कसे बदलते याचाही नमो इंडिया ट्रेन हा पुरावा आहे. तसेच 'ज्या गोष्टींचे आम्ही भूमिपूजन करतो, त्या गोष्टींचे उद्घाटन देखील आम्हीच करतो,' असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना चिमटा काढला. दरम्यान, उद्घाटनानंतर पंतप्रधान मोदींनी नमो भारत ट्रेनमधुन प्रवास केला. यावेळी त्यांनी ट्रेनमधील महिला कर्मचारी आणि शाळकरी मुलांशी संवाद साधला. प्रादेशिक जलद संक्रमण प्रणालीच्या पहिल्या टप्प्यात साहिबााबाद, गाझियाबाद, गुलधर, दुहई आणि दुहाई डेपो असे ५ स्थानक आहेत. एकुण ६ डबे असलेल्या या जलद रेल्वेमध्ये मेट्रोच्या धर्तीवर महिलांसाठी स्वतंत्र डबा असणार आहे.

तसेच ५० टक्क्यांहून अधिक कर्मचारी देखील महिला असतील. दिल्ली – गाझियाबाद – मेरठ हा कॉरिडॉर ८२.१५ किलोमीटर लांब आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३० हजार कोटी रुपये खर्च केले जात आहेत. या कॉरिडॉरमधील १७ किलोमीटर लांबीचा पहिला टप्पा साहिबााबाद स्टेशन ते गाझियाबादमधील दुहाई डेपोपर्यंत पूर्ण झाला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलेल्या जलद रेल्वे सेवेचे नाव आधी रॅपिडेक्स ठेवण्यात आले होते. मात्र उद्घाटनापूर्वी ते बदलून नमो भारत केले गेले. यावर काँग्रेसने जोरदार हल्ला चढवला आहे. "नमो स्टेडियमनंतर आता नमो ट्रेन. आत्ममुग्धतेची कोणतीही पराकाष्ठा नाही" असे काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले तर "याआधी अहमदाबाद स्टेडियमचे नावही नरेंद्र मोदी स्टेडियम झाले आहे. फक्त भारतच का लिहिले? देशाचे नाव बदलून नमो करा," असे काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांनी म्हटले आहे.

# संजय सिंह यांना आणखी एक धक्का!

## » ईडीच्या अटकेविरोधातली याचिका फेटाळली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आम आदमी पार्टीचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांना कथित दिल्ली मद्यविक्री घोटाळा प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने ६ ऑक्टोबर रोजी ५ दिवसांची सक्तवसुली संचालनालयाची (ईडी) कोठडी सुनावली होती. या कोठडीनंतर संजय सिंह यांना १३ ऑक्टोबर रोजी राउज एवेन्यू न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. त्यावेळी सिंह यांना १४ दिवसांची न्यायलयीन कोठडी सुनावण्यात आली. यापुढची सुनावणी २७ ऑक्टोबरला होणार आहे.**



### अदाणींचं नाव घेतल्यानं न्यायाधीश संतापले

» ईडीने संजय सिंह यांच्या चौकशीसाठी १० दिवसांची कोठडी मागितली होती. परंतु, न्यायालयाने ईडीला १० ऑक्टोबरपर्यंत सिंह यांची कोठडी मंजूर केली. आपल्याला झालेली अटक हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेला अन्याय आहे, ते आगामी निवडणुकीत पराभूत होतील, अशी टीका संजय सिंह यांनी केली होती. न्यायालयाने संजय सिंह यांना आपलं मत मांडण्याची संधी दिली होती. तेव्हा संजय सिंह यांनी ईडीला लक्ष्य करत उद्योगपती गौतम अदाणी यांचा उल्लेख केला होता. त्यामुळे न्यायाधीश त्यांच्यावर संतापले होते.

दरम्यान, संजय सिंह यांनी या कोठडीविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. ईडीने अटकेचं कारण सांगितलं नसून ही अटक बेकायदेशीर ठरवावी, अशी मागणी संजय सिंह यांनी केली होती. परंतु, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती स्वर्णकांता यांनी संजय सिंह यांची याचिका फेटाळली आहे. ईडीने ६ ऑक्टोबर रोजी सिंह यांच्याशी संबंधित अनेक ठिकाणी छापे टाकले, त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर त्यांना गुरुवारी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. ईडीने संजय सिंह यांच्या चौकशीसाठी १० दिवसांची कोठडी मागितली होती. परंतु, न्यायालयाने ईडीला १० ऑक्टोबरपर्यंत सिंह यांची कोठडी मंजूर केली. आपल्याला झालेली अटक हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेला अन्याय आहे, ते आगामी निवडणुकीत पराभूत होतील, अशी टीका संजय सिंह यांनी केली होती. संजय सिंह यांच्याविरोधातले पुरावे जाहीर करावेत, असं आव्हान 'आप'ने भाजपाला दिलं होतं. संजय सिंह यांना अटक करून त्यांचा आवाज दाबण्याचा केंद्र सरकार प्रयत्न करत असल्याचा आरोप 'आप'च्या वरिष्ठ नेत्या अतिशी यांनी केला होता. संजय सिंह यांना १३ ऑक्टोबर रोजी दिल्लीतल्या राउज एवेन्यू न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. त्यावेळी संजय सिंह यांच्या एका कृतीवरून न्यायाधीशांनी नाराजी व्यक्त केली होती.

# इस्रायल -हमास युद्धात रशियाची उडी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

इस्रायल आणि पॅलेस्टाईनमधील दहशतवादी संघटना हमासमधील युद्धाला आता दोन आठवडे झाले आहेत. या दोन आठवड्यांमध्ये दोन्ही बाजूच्या हाजारो लोकांचा बळी गेला आहे. या युद्धामुळे जगभरातील देशांमध्ये दोन गट पडले आहेत. अमेरिका आणि इंग्लंडने इस्रायलचं खुलं समर्थन केलं आहे. दोन्ही राष्ट्रांच्या प्रमुखांनी युद्धकाळात इस्रायलचा दौरा करून आपण या युद्धात इस्रायलबरोबर असल्याचा संदेश दिला आहे. अशातच, आता आणखी एक शक्तीशाली देश या युद्धात उडी घेणार असल्याचं सांगितलं जात आहे. हा शक्तीशाली देश म्हणजे रशिया.

दहशतवादी संघटना हमासने रशियाशी संपर्क साधला आहे. हमासच्या दहशतवाद्यांनी २०० हून अधिक नागरिकांना ओलीस ठेवलं आहे. या ओलिसांना सोडण्याबाबत रशिया आणि हमासमध्ये चर्चा झाल्याचं सांगितलं जात आहे. जगातल्या दोन महाशक्ती अमेरिका आणि रशियाने या युद्धात उडी घेतल्याने याचा संपूर्ण जगाला फटका बसू शकतो. इस्रायल हमास युद्धाबाबतच्या अमेरिका आणि रशियाच्या भूमिका जगाला शीतयुद्धाची आठवण करून देत आहेत. इस्रायल-हमास युद्धाबाबत अमेरिकेने कठोर भूमिका घेतली आहे.

अमेरिकेने इस्रायलच्या मदतीसाठी भूमध्य सागरात युद्धनौका तैनात केल्या आहेत. या युद्धनौकांवर लढाऊ विमानंही तैनात करण्यात आली आहेत.. तर दुसऱ्या बाजूला रशियाने काळ्या समुद्रात विध्वसंक क्षेपणास्रं आणि लढाऊ विमानं तैनात केली आहेत. ही परिस्थिती पाहता जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असल्याचं बोललं जात आहे. रशियाच्या इस्रायलमधील राजदूतांच्या हवाल्याने दी टाईम्स ऑफ इस्रायल या वृत्तपत्राने म्हटलं आहे की, रशिया हमासच्या संपर्कात आहे.



# नवरात्रीचा सातवा दिवस कालरात्रि देवीचा!

संपूर्ण देशभरात शनिवारी नवरात्रीचा सातवा दिवस साजरा केला जाणार आहे. नवरात्रीच्या सातव्या दिवशी दुर्गामातेचे सातवे रुप देवी कालरात्रिची पूजा करण्याची परंपरा आहे. कालरात्रि देवी दुष्टांचा नाश करण्यासाठी ओळखली जाते. यामुळेच तिला कालरात्रि नावाने ओळखले जाते. देवी आपल्या भक्तांना नेहमी सुख-समृद्धीचा आशीर्वादचा देते. कालरात्रि देवीची उपासना केल्याने भय आणि रोग नष्ट होतात. याशिवाय, भूतबाधा आणि अकाली मृत्यू टळतो, असे मानले जाते.

## कालरात्री देवीचे रुप

» कालरात्री देवीचे शरीर काळ्या रंगाचे आहे. शुंभ, निशुंभ आणि रक्तबीजचा नाश करण्यासाठी दुर्गामातेने कालरात्रिचे रुप धारण केले होते. देवीच्या श्वासातून अग्नी निघतो आणि तिच्या गळ्यात चमकणारी माळ आहे. देवीला चार हात आहेत असून एका हातात तलवार, दुसऱ्या हातात लोखंडी शस्त्र, तिसऱ्या हातात अभय मुद्रा आणि चौथ्या हातात वरमुद्रा आहे. दुर्गामातेचे हे रुप पापांचा नाश करण्यासाठी आहे. ती भक्तांकडे करुणेने पाहत आहे.



## पूजेची पद्धत

» शारदीय नवरात्रीच्या सातव्या दिवशी सकाळी लवकर उठून अंघोळ करावी. आंघोळीनंतर देवीसमोर तुपाचा दिवा लावा. देवीला लाल रंगाची फुले अर्पण करा. देवी कालरात्रिच्या पूजेसाठी मिठाई, पाच ड्रायफ्रुट्स, पाच फळे, धूप, फुले आणि गुळाचा नैवेद्य तयार करावा. या दिवशी गुळाला विशेष महत्त्व दिले जाते. कालरात्रीला गूळ किंवा त्यापासून बनवलेले पदार्थ अर्पण करावे. पूजा संपल्यानंतर देवीच्या मंत्रांचा जप करावा.

# ऑस्ट्रेलियाचा सलग दुसरा विजय!

## ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा 62 धावांनी उडवला धुव्वा

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वचषक २०२३ मधील १८वा सामना शुक्रवारी बंगळुरुच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला. या सामन्यात ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तानचे संघ आमनेसामने आले होते. हा सामना ऑस्ट्रेलिया संघाने ६२ धावांनी जिंकला. या सामन्यात पाकिस्तान संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा करण्याचा निर्णय घेतला होता. ऑस्ट्रेलिया संघाने प्रथम फलंदाजी करताना डेव्हिड वार्नर आणि आणि मिचेल मार्शच्या भागीदारीच्या जोरावर ९ गडी गमावून ३६७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ ४५.३ षटकांत ३०५ धावांवर आटोपला.**






यासह कांगारू संघाने स्पर्धेतील सलग दुसरा विजय नोंदवला आहे. त्याचबरोबर या विश्वचषकात पाकिस्तानचा हा सलग दुसरा पराभव आहे. यापूर्वी भारताविरुद्धही पाकिस्तानला पराभवाचा सामना करावा लागला होता. आता ऑस्ट्रेलियन संघ गुणतालिकेत अव्वल चार संघांमध्ये सामील झाला आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून ॲडम झाम्पाने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर डेव्हिड वार्नर १६३ आणि मिचेल मार्शने १२१ धावांचे योगदान दिले. डेव्हिड वार्नरला त्याच्या वादळी खेळीसाठी सामनावीर पुरस्कार देण्यात आला. ३६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या पाकिस्तान संघानेही दमदार सुरुवात केली. अब्दुल्ला शफीक आणि इमाम-उल-हक यांच्यात पहिल्या विकेटसाठी १३४ धावांची शानदार भागीदारी साकारली. शफीकने ६४ धावांची तर इमामने ७० धावांची खेळी खेळली. या दोघांशिवाय मोहम्मद रिझवानने ४६ धावांची, सौद शकीलने ३० धावांची आणि इफ्तिखार अहमदने २६ धावांची खेळी खेळली. याशिवाय एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही.

पाकिस्तानची फलंदाजी पाहून त्यांचा संघ लक्ष्य गाठू शकेल असे वाटत होते, मात्र ऑस्ट्रेलियाचा फिरकी गोलंदाज ॲडम झाम्पाने हे होऊ दिले नाही. ॲडम झाम्पाने १० षटकांत ५३ धावा देत ४ महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. झाम्पाने बाबर आझम, इफ्तिखार अहमद, मोहम्मद रिझवान आणि मोहम्मद नवाज यांची विकेट घेत पाकिस्तानचे स्वप्न भंगले. ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानला ३६८ धावांचे लक्ष्य दिले होते. ऑस्ट्रेलियासाठी दोन्ही सलामीवीर फलंदाजांनी शतके झळकावली. डेव्हिड वॉर्नरने १६३ आणि मिचेल मार्शने १२१ धावा केल्या. या दोघांशिवाय अन्य कोणत्याही फलंदाजाला २५ धावांचा पल्ला गाठता आला नाही. मार्कस स्टॉइनिसने २१ धावा केल्या. जोश इंग्लिशने १३ धावांचे योगदान दिले. मार्नस लाबुशेन आठ आणि स्टीव्ह स्मिथ सात धावा करून बाद झाला. पॅट कमिन्सने सहा आणि मिचेल स्टार्कने दोन धावा केल्या. ग्लेन मॅक्सवेल आणि जोश हेझलवूड खातेही उघडू शकले नाहीत. ॲडम झाम्पा एक धाव काढून नाबाद परतला. पाकिस्तानकडून शाहीन आफ्रिदीने सर्वाधिक ५ विकेट्स घेत्या. तसेच हरिस रौफने तीन विकेट्स घेतल्या आणि उसामा मीरने एक विकेट घेतली.

### वॉर्नर आणि मार्शने केला नवा विक्रम

» डेव्हिड वॉर्नरने एकदिवसीय कारकिर्दीतील २१वे शतक तर मार्शने दुसरे शतक झळकावले. दोन्ही फलंदाजांनी मैदानात चौफेर फटकेबाजी करत पाकिस्तानी खेळाडूंना खूप हैरान केले. वॉर्नर आणि मार्श यांनी मिळून ऑस्ट्रेलियासाठी इतिहासही रचला. विश्वचषकात ऑस्ट्रेलियाच्या दोन्ही सलामीवीरांनी एका सामन्यात शतकी खेळी करण्याची ही पहिलीच वेळ आहे. डेव्हिड वॉर्नर आणि मिचेल मार्श यांनी विश्वचषकात ऑस्ट्रेलियासाठी पहिल्या विकेटसाठी सर्वात मोठी २५९ धावांची भागीदारीही केली. याच मैदानावर २०११ च्या विश्वचषकात शेन वॉटसन आणि ब्रॅड हॅडिन यांनी कॅनडाविरुद्ध पहिल्या विकेटसाठी १८२ धावांची भागीदारी केली होती.

# विजयी पुनरागमनाचे ध्येय!

## आज इंग्लंडसमोर दक्षिण आफ्रिकेचे आव्हान

।कोल्हापूर । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आपल्या गेल्या सामन्यांत तुलनेने दुबळ्या संघांविरुद्ध पराभूत झालेल्या इंग्लंड व दक्षिण आफ्रिका या संघांचे विजयी पुनरागमनाचे ध्येय असून एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत हे संघ शनिवारी एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत. हा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळला जाईल. गेल्या सामन्यात गतविजेत्या इंग्लंडला अफगाणिस्तान, तर दक्षिण आफ्रिकेला नेदरलँड्सने पराभवाचा धक्का दिला होता.**



> फगाणिस्तानकडून झालेल्या पराभवाला आम्ही मागे सोडले आहे. आगामी सामन्यांबाबत संघात चांगली चर्चाही झाली. सरावातही खेळाडूंमध्ये उत्साह पाहायला मिळाला. संघनिवड करताना आमच्याकडे चांगले पर्याय आहेत. त्यामुळे अंतिम अकरा खेळाडूंची निवड करताना आम्हाला काही अवघड निर्णय घ्यावे लागतील. बेन स्टोक्सने चांगला सराव केला. स्टोक्सच्या उपस्थितीमुळे संघासाठी चांगले पर्याय उपलब्ध होतात. तसेच तो मैदानात असल्यास कर्णधार म्हणून मलाही मदत होते.
>
> **- जोस बटलर,** इंग्लंडचा कर्णधार

टेम्बा बवुमाच्या नेतृत्वाखालील आफ्रिकेने स्पर्धेला चांगली सुरुवात केली होती. मात्र, नेदरलँड्सविरुद्ध त्यांची फलंदाजी ढेपाळली.

इंग्लंडविरुद्ध त्यांचा प्रयत्न पुन्हा एकदा चांगली कामगिरी करण्याचा असेल. गेला सामना सोडल्यास दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांची शीर्ष फळी चांगल्या लयीत आहे. सलामीवीर क्विंटन डिकॉक, रासी व्हॅन डर डसन, एडीन मार्करम यांनी शतके साकारली आहेत.

वानखेडे स्टेडियमची सीमारेषा जवळ असल्याने याचा फायदा फलंदाजांना होऊ शकतो. नेदरलँड्सविरुद्ध संघाला सातत्याने गडी गमावल्याचा फटका बसला. ही चूक त्यांनी सुधारणे गरजेचे आहे. आफ्रिकेची वानखेडेवरील कामगिरी यापूर्वी चांगली झाली आहे, जी संघासाठी सकारात्मक बाब आहे. दुसरीकडे, गतविजेता इंग्लंडचा संघ आफ्रिकेविरुद्ध आपली सर्वोत्तम कामगिरी करण्यास उत्सुक असेल. मात्र, इंग्लंडच्या फलंदाजांना यासाठी कामगिरीत सातत्य आणावे लागेल.

# शाहीनने केली सासऱ्याच्या पराक्रमाची पुनरावृत्ती!

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

सध्या शाहीन आफ्रिदी या युवा गोलंदाजाची गणना जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाजांमध्ये केली जाते. नव्या चेंडूवर विकेट्स कशी घ्यायची, हे त्याला चांगलेच माहीत आहे. भारतात सुरू असलेल्या आयसीसी क्रिकेट विश्वचषक २०२३ च्या स्पर्धेत संघाचा विजय किंवा पराभव या खेळाडूच्या कामगिरीवर अवलंबून आहे.

अल्पावधीतच पाकिस्तान संघात आपले स्थान पक्के करणारा हा नवोदित वेगवान गोलंदाज काही वेळातच मॅचविनर गोलंदाज ठरला. उंच डाव्या हाताचा वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीने ऑस्ट्रेलियाविरुद्ध शानदार गोलंदाजी केली. २३ वर्षीय शाहीन आफ्रिदीने एकदिवसीय विश्वचषकाच्या १८ व्या सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५४ धावांत ५ विकेट्स घेतल्या. या दरम्यान त्याने एक षटक निर्धाव टाकले. विश्वचषकाच्या इतिहासात शाहीन आफ्रिदीने ५ विकेट्स घेण्याची ही दुसरी वेळ आहे. शाहीनने याआधी २०१९ विश्वचषकात बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात ६ बळी घेतले होते. त्याने ५ जुलै २०१९ रोजी लॉर्ड्स येथे बांगलादेशविरुद्ध ९.१ षटकांत ३५ धावांत एकूण ६ विकेट घेतल्या होत्या. पाकिस्तानकडून माजी कर्णधार शाहिद आफ्रिदी आणि सध्याचे शाहीन आफ्रिदीचे सासरे यांनी २०११ च्या विश्वचषकात दोनदा एका सामन्यात ५ विकेट्स घेतल्या होत्या. शाहिद आफ्रिदीने मार्च २०११ मध्ये कॅनडाविरुद्ध १० षटकांत २३ धावा देऊन ५ विकेट्स घेतल्या होत्या. याच विश्वचषकात त्याने केनियाविरुद्ध ८ षटके टाकताना, ३ षटके निर्धाव टाकून १६ धावा देत ५ खेळाडूंना पॅव्हेलियनमध्ये पाठवले होते.